| MHKO110021152021 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक २०४/२०२१**<br>**निशाणी क्रमांक ४१ वरील आदेश**<br>**( कु. स्वरा मनोज कोळी व इतर विरुध्द श्री.मनोज वसंत कोळी व इतर )** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे कलम १५१ व ९४ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनाप्रमाणे प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटणीसाठी व कायम मनाई होवून मिळेणकरीता दाखल केलेला आहे.

**१.** दावा मिळकतीचे वर्णन :– जिल्हा कोल्हापूर, तालुका हातकणंगले पैकी मौजे भादोले येथिल गट नंबर ७३५, क्षेत्र– ४ हे .८४ आर. पो.ख. ० हे .२५ आर आकार– १३ रु. ८३ पैसे या मिळकतीपैकी ० हे. ४८.५० आर, आकार १ रु. ३० पैसेची मिळकत यासी चुत:सिमा.

पूर्वेस – सदर गट नंबर ७३५ पैकी श्री. महेश वसंत कोळी यांची मिळकत.

पश्चिमेस – सदर गट नंबर ७१५ पैकी श्री. माणिक वसंतराव कोळी यांची मिळकत.

दक्षिणेस – रस्ता.

उत्तरेस – सदर गट नंबर ७३५ पैकी श्री.पांडुरंग सीताराम पाटील यांची मिळकत.

**( या चतु:सिमेतील मिळकतीस यापुढे दावा मिळकत असे संबोधणेत आले आहे )**

०३. **वादी व प्रतिवादी नंबर १ यांची वंशावळ खालीलप्रमाणे**

**मनोज ( प्रवादी नं.१ )**

| | | |
|---|---|---|
| **कु.स्वरा ( वादी नं १)** | **चि.रुद्र ( वादी नं.२)** | **वंदना ( वादी नं.३)** |
| **(मुलगी )** | **( मुलगा)** | **( पत्नी)** |

**०४.** यातील वादी यांचे पुढे कथन असे की, वर कलम (१) यात नमूद केलेली मिळकत ही प्रतिवादी नंबर १ यांची मालकी वहीवाटीची, वडीलार्जित मिळकत आहे. प्रतिवादी नंबर १ हे वादी नंबर १ व २ चे वडील आहेत व वादी नंबर ३ चे पती आहेत. प्रतिवादी नंबर १ यांचे नाव दावा मिळकतीचे ७/१२ पत्रकी मालक कोष्टकी मालक म्हणून वारसा डायरी नंबर १६३५४ चे आधारे नोंद झालेले आहे. सदर दावा मिळकत ही हिंदू एकत्र कुटूंबाची आहे. सदर मिळकतीत वादी क्रमांक १ ते ३ यांचा अविभक्त असा हिस्सा आहे. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादी यांचेविरुध्द दावा मिळकत सरस–निरस मानाने वाटून मिळणेसाठी व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. तसेच सदर कामी निशाणी ५ ला तुर्तातूर्त मनाई अर्ज दाखल केला होता. सदर निशाणी ५ चे अर्ज गुणदोषावर चालून त्या कामी मे.कोर्टानी खालीप्रमाणे आदेश केलेला आहे.

**– आदेश –**

**१.** वादी यांचा निशाणी क्रमांक ५ वरील तुर्तातूर्त मनाईचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी व तर्फे इसमांनी दावा मिळकतीमधील वादी यांचे शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही व कसल्याही प्रकारे हरकत व अडथळा करु नये, दावा मिळकत कोणासही विक्री अथवा कोणत्याही प्रकारे तबदिल करु नये. तसेच दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाई आदेश देण्यात येत आहे.

**३.** अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

**येणेप्रमाणे दिनांक ०५.०३.२०२२ रोजी मे.कोर्टानी हुकूम केलेला आहे.**

**०५.** अशी परिस्थीती असताना वादी नंबर ३ या सदर दावा मिळकतीत अन्य इसमांचेकडून कष्ट मशागत करुन घेऊन शेती करीत आहेत. तसेच वादी क्रमांक १ ही मुलगी इयत्ता १२ वी मध्ये शिकत असून, वादी नंबर २ हा मुलगा इयत्ता ९ वी मध्ये सध्या शिकत आहेत. परंतू सदय परिस्थीतीत वादींना आर्थिक देणे झाले असून वादी

नंबर १ व २ यांचे शिक्षणाचा खर्चही वाढलेला आहे. त्यामुळे वादींचे वर हलाखीची परिस्थीती ओढवलेली आहे. वादींना दावा मिळकतीतून मिळणारे उत्पन्ना खेरीज अन्य उत्पन्न नाही. त्यामुळे घर खर्च चालणे अडचणीचे झालेले आहे. सदरचा दावा गुणदोषावर चालून निकाल लागणेस कालावधी लागणार आहे. प्रस्तुत वादी यांचे पुढे असे कथन की, त्यामुळे वादीस प्रतिवादी नंबर १ चे नावे असले दावा मिळकतीपैकी ० हे .१० आर क्षेत्रावर कर्ज काढणे किंवा ० हे १० आर विक्री करणे याशिवाय वादींना मार्ग नाही. प्रतिवादी नंबर १ यांना उत्पन्नाचे काहीही साधन नाही व ते काहीही काम धंदा करीत नाहीत. सदर दावा मिळकत प्रतिवादी नंबर १ चे नांवे असलेने व मे.कोर्टानी सदर दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये असा आदेश असलेने वादींना उपजिवीकेसाठी अन्य कोणताही मार्ग उपलब्ध नाही. सबब वादीची विनंती की, दावा मिळकतीपैकी ० हे .१० आर क्षेत्रावर कर्ज काढणे किंवा ० हे .१० आर विक्री करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

**०६.** प्रस्तुत कामी यातील प्रतिवादी क्रमांक १ तर्फे निशाणी ४१ चे अर्जास निशाणी ४२ वर म्हणणे दाखल केले असून प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ चे म्हणणे असे की, प्रस्तुत निशाणी ४१ चे अर्जातील वादीने दिलेल्या अर्जातील कलम १ ते ६ मधील मजकूर खरा व बरोबर आहे. तसेच यातील वादीने दिले अर्जातील नमूद मजकूराप्रमाणे माझी तब्येत बरी नसलेने तसेच माझी शारीरीक स्थिती ठीक नसलने मला कोणतेही काम करणे जमत नाही. त्यामुळे माझी आर्थिक स्थीती खालावली आहे. तसेच वादी हे दावा मिळकतीमधून काही उत्पन्न मिळाले नसलेने वादींचेवर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यामुळे वादी क्रमांक १ व २ यांचे शिक्षणाचे हाल होत आहे. तरी वादी यांनी मागणी केलेप्रमाणे दावा मिळकतीपैकी ० हे १० आर क्षेत्र विक्री करणेस आवश्यक तेथे सहया करणेस मी तयार आहे. सदर विक्रीतून मिळणारी संपूर्ण रक्कम वादी यांना देणेस मी तयार आहे. सबब, वादी यांचा अर्ज मंजूर करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**०७.** तसेच प्रस्तुत प्रतिवादी क्रमांक १ मनोज वसंत कोळी यांनी दिनांक २४.०३.२०२५ रोजी ॲफीडेव्हीट दाखल करुन निशाणी ४१ ला वादीतर्फे दिलेले अर्जास निशाणी ४२ ला म्हाणणे दाखल केलेले आहे. त्यातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे असे ॲफीडेव्हीट दिले आहे.

**०८.** यातील प्रतिवादी क्रमांक २ व ३ यांनी अदयापही प्रस्तुत कामी म्हणणे दिलेले नाही. त्यामुळे दिनांक २४.०३.२०२५ रोजी निशाणी ४१ वर त्यांचे विरुध्द म्हणणे नाही असा आदेश पारीत करणेत आला व प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणण्याशिवाय चालविणेत आला.

**०९.** अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी त्यांनी दिलेल्या अर्जानुसार युक्तीवाद केला.

**१०.** प्रस्तुतचा अर्ज हा वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ व ९४ प्रमाणे दाखल केलेला आहे. कायदयातील स्थापित सिध्दांतानुसार दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये तरतूद असल्यास कलम १५१ मध्ये निर्धारित केलेले विशेष अधिकार न्यायालयास वापरता येत नाही. प्रस्तुत प्रकरणात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ मध्ये मनाई हुकूमाबाबत तरतूद केलेली आहे. अशा परिस्थीतीत कलम १५१ नुसार आदेश देणे योग्य होणार नाही. परंतू केवळ सदर अतितांत्रीक बाबीचा अवलंब करुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. याउलट अर्ज गुणदोषावर निकाली करणे उचित होईल.

**११.** सुरुवातीस हे नमूद करणे आवश्यक आहे की, यापूर्वी वादी यांनी निशाणी ०५ कडे अर्ज दाखल करुन आज्ञार्थी व तात्पूरत्या मनाई हुकूमाकरीता दाद मागितलेली होती. परंतू सदर अर्जामध्ये दाव्याच्या अंतिम निकाला होईपर्यंत प्रतिवादी क्रमांक १ ते

३ यांनी व तर्फे इसमांनी दावा मिळकतीमध्यील वादी यांच्या शांततामय कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करु नये. तसेच दावा मिळकत कोणासही विक्री अथवा कोणत्याही प्रकारे तबदिल करु नये. तसेच दावा मिळकतीवर बोजा निर्माण करु नये असा तुर्तातूर्त मनाई दिलेली होती.

१२. **Section 94(c) मध्ये नमूद केले आहे -**

A Court may grant Injunction an only if it is so presecribed. Section 2(16) of CPC मध्ये नमूद आहे की, Prescribed view prescribed by the Rules- वादीने तुर्तातूर्त मनाई आदेश प्रतिवादी नंबर १ ते ३ विरोधात घेतला आहे. जरी प्रतिवादी नंबर १ यांची संमती आहे तरीही आदेश ३९(१) मधील निर्णय कलम ९४ नुसार बदलता येणार नाही.

१३. तथापि वादीतर्फे विधिज्ञ यांनी युक्तीवाद केला की, दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ९४ नुसार वादीस दावा मिळकत विक्री करण्याचा अधिकार प्रतिवादी नंबर १ यांनी दिला आहे. प्रतिवादी नंबर १ यांचे विक्री/ कर्ज मागणीबाबत समंत्ती असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी नंबर १ यांनी ॲफीडेव्हीट दाखल केले आहे. प्रतिवादी नंबर २ व ३ यांनी करारपत्रानुसार खरेदीचा दावा दाखल केल्याचे अभिलेखावर नमूद नाही. वादी यांना प्रतिवादी नंबर १ यांनी दिलेल्या संमत्तीनुसार निशाणी ०५ चे आदेशास हरकत घेतली नाही. मनोज कोळी प्रतिवादी नंबर १ यांचे नांवे ७/१२ नुसार ०.४८.५० क्षेत्र गट क्रमांक ७३५ मध्ये आहे. मारुती कोळी यांना ५ आरची जमिन करारपत्राने दिली आहे. मारुती पाटील यांना २ आरची जमिन करारपत्राने दिली आहे. दिनांक ०५.०३.२०२२ रोजी वादीचे बाजूने दावा मिळकतीबाबत तुर्तातूर्त मनाई अर्ज मंजूर केला आहे. कलम ९४ नुसार न्यायाच्या दृष्टीने योग्य पूरक कार्यवाही करण्याचे आदेश देता येतील. तथापि निशाणी ५ चे आदेशाचे विरोधात आदेश देता येणार नाहीत.

प्रतिवादी नंबर २ आणि ३ यांचे दावा मिळकती संदर्भात असलेल्या कायदेशीर हक्कांचे संबंधित आधीन राहून दावा मिळकतीचे व्यवहार करणेबाबत वादी आणि प्रतिवादी नंबर १ हे स्वत:चे जबाबदारीवर आणि त्यांचे स्वेच्छेने, कायदेशीर नियमास अधिन राहून, अटी शर्थीनुसार वरिष्ठ न्यायालयाची परवानगी घेवू शकतात अगर दावा मिळकतीमधील निशाणी ०५ चे आदेशाविरुध्द अपिल करु शकतात. दावा मिळकतीमध्ये अदयाप सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही. वादी नंबर १, २ , ३ यांचा हिस्सा निश्चित झाला नाही. वादीने त्याचा दावा संपूर्ण सिध्द केला नाही. त्यामुळे वादी दावा प्रलंबित असताना दावा मिळकत विक्री करु शकत नाही. सबब, मी खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

**१.** वादीचा अर्ज (निशाणी ४१) नामंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तुत दावा जलद गतीने होण्यासाठी योग्य तो पुरावा वादी देवू शकतात.

Sd/-

( श्रीमती एस.जे. पेंडे )
०२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठवडगांव

ठिकाणः– पेठवडगांव
दिनांकः– २४.०३.२०२५.